
# मला काही सांगाचंय

प्रफुल शेजव



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

प्रफुल राजेंद्रराव शेजव

लिखित

कादंबरी

# मला काही सांगाचंय...

## मला काही सांगाचंय...

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला

पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मला काही सांगाचंय... (कादंबरी)

लेखक : प्रफुल राजेंद्रराव शेजव

शिक्षण : MBA

ई मेल : praful101shejao@gmail. com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : १० डिसेंबर २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे .

प्रिय रसिक वाचकांनो,



मी प्रफुल शेजव शाळेत शिकत असताना मला वाचनाचा छंद जडला... त्याच सारे श्रेय माझ्या गावी असणारं संत गाडगेबाबा सार्वजनिक वाचनालय आणि माझे मित्र यांना जातं... सुरुवातीला मी कथा वाचत असे... जवळ जवळ दहावीला असेपर्यंत मी कथा वाचल्या... माझ्या आयुष्यातील मी सर्वात प्रथम वाचलेली कादंबरी म्हणजे “समर्पिता” देवदत्त पाटील यांची... आणि त्यांनतर मात्र मी देवदत्त पाटील यांच्या आमच्याकडे होत्या त्या सर्व कादंबरी वाचून काढल्या... आणि माझ्यातल्या वाचकाचा केव्हा रसिक झाला मलासुद्धा कळलं नाही.. मग मी वपु काळे, वि. स. खांडेकर, दातारशास्त्री, पु. ल. देशपांडे यांचे साहित्य वाचायला लागलो...

वि. स. खांडेकर यांच ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त “ययाति” मी तीनदा वाचलं... वा. वा. पाटणकर यांची मराठी शायरी जी रसग्रहण संग्रह करून “ दुनिया तुला विसरेल” या नावाने वपु काळे यांनी व्यक्त केले आहे... माझं आवडतं पुस्तक आहे...

आता मला कादंबरी आणि कविता विशेष आवडतात... असं वाचन सुरु असता मी पदवीला शिकत असतांना पहिली कविता लिहिली आणि मित्रांनी मला ती कविता कॉलेजच्या वार्षिक अंकामध्ये देण्यास सुचवले.... त्याचा उत्तम प्रतिसाद मला मिळाला... आणि मी आणखी उत्साहाने कविता सह लेख हि लिहायला लागलो... पण कोलेजनंतर माझं वाचन आणि लेखन दोन्ही बाजूला ठेवून मला एम बी ए ला दोन वर्ष द्यावे लागले..... मग एम बी ए पूर्ण झाल्यानंतर पुन्हा वाचन सुरु झालं... सवड मिळेल तसं थोडंफार लिहिलं आणि इतक्यात एका मित्राकडून ज्याचं नाव विशाल इंगळे आहे, त्य्च्याकडून मला ई प्रतिष्ठान बद्दल माहिती मिळाली.... मला सांगायला आवडेल कि विशाल इंगळे सुद्धा एक लेखक असून त्याने "हा क्षण" नावाचं पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठान च्या मदतीने प्रकाशित केले आहे.... त्याच्यासोबत मैत्री झाली आणि मला आपणा समोर येण्याची संधी उपलब्ध करून दिली....

तसं तुम्हा वाचकांना माझ्याबद्दल नक्की काय सांगावं मला ठाऊक नाही कारण मी पहिल्यांदाच लेखक म्हणून आपणा समोर येत आहे... ई साहित्य प्रतिष्ठान यांनी दिलेल्या संधीमुळे... " मला काही सांगचंय" या माझ्या पुस्तकाच्या निमित्ताने मला आपणास या पुस्तकरूपाने भेटता येत आहे... तरी माझा हा पहिला प्रयत्न आपणास कसा वाटला ते नक्की कळवा. कारण या पुस्तकाचा पुढचा भाग आपण वाचकांनी दिलेल्या प्रतिसादावर अवलंबून आहे.... तर रसिक वाचकांनो आपला अभिप्राय कळवा, माझं पुस्तक आपणांस आवडेल हि अपेक्षा आहे.....

आपली प्रतिक्रिया जरूर व्यक्त करा..... चांगलंच नाही तर पुस्तक वाचतांनी जे अनुभवलं ते सांगा.... सांगाल ना? ?

माझं पहिलं पुस्तक मी प्रकाशित करू शकलो त्याकरिता माननीय सुनिल सामंत सर आणि सम्पूर्ण ई प्रतिष्ठान टीम चे आभार.. मनापासून धन्यवाद.. !

लेखक : प्रफुल राजेंद्रराव शेजव

शिक्षण : MBA

ई मेल : praful101shejao@gmail. com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

अर्पणपत्रिका

मी आज जे काही आहे त्याचं सम्पूर्ण श्रेय माझ्या आई वडिलांना जातं... ज्यांच्या मेहनत आणि आशीर्वाद मी घडलो... तसेच मला खूप प्रेम करणाऱ्या माझ्या ताई आणि लहान भावाला.... त्यांना आणि मैत्रीच्या धाग्यात मोत्यासमान ओवलेल्या सर्व मित्रांना तसेच सर्व अमूल्य नात्यांना समर्पित..

## अनुक्रमणिका:


१. शेवटचा संवाद..?

२. घात कि अपघात?

३. अघटित

४. पूर्वकल्पना

५. वास्तव अवास्तव

६. परिचय

७. आसवांची परीक्षा

८. कुमारची डायरी

९. डायरीचं गूढ

१०. मध्यरात्र

११. एक नवीन पहाट

१२. शेवट कि सुरुवात?

## १. शेवटचा संवाद....?

उन्हाळा ऋतू । एप्रिल महिन्यात  दिवसभर प्रवास करून सूर्य मावळतीला आला, तसे चिमणी पाखरांचे थवे शांततेने परत आपल्या घराट्याच्या दिशेने निघाले तर दुचाकी चारचाकी वाहने तीच शांतता भंग करत, सर्व, घराच्या दिशेने निघाले, त्याच गर्दीत एक युवक आपल्या दुचाकीवरून जात होता बहुतेक घरीच । मध्येच दुचाकीचा वेग कमी करून त्याने मोबाइल बाहेर काढला आणि कानाला लावलेले हेडफोन ठीक करत रिंग जात आहे कि नाही ऐकायला लागला, तोच दुसऱ्या बाजूने

“हॅलो कोण बोलतंय? ” असा आवाज येताच एक दीर्घ श्वास घेत त्यानेसुद्धा हॅलो म्हणत प्रतिसाद दिला दुसऱ्या मोबाईल वरून “हॅलो... कुमार? तू बोलतोस? ”

थोडा आणखी वेग कमी करून कुमार बोलू लागला...

“बस सहज तुझी आठवण आली म्हणून फोन केला आणि...... आणि....” असं अडखडत तो बोलला.

दुसऱ्या मोबाइल वरून

“आणि... आणि.. काय म्हणतोस असा थांबला का एकदम? हॅलो बोल ना काय झालं? चार वर्षानंतर अचानक कसा फोन केलास? ”

कुमार दुचाकीचा वेग वाढवून मोबाईलवर बोलायला लागला....

“आज 18 एप्रिल... तुझा वाढदिवस... म्हणून.. तुला शुभेच्छा... देण्यासाठी फोन.. केला...” कुमार म्हणाला.

“तुला आठवण होता माझा वाढदिवस? मला वाटलं तू विसरला असशील मला.” दुसऱ्या मोबाईल वरून प्रतिसाद मिळाला

त्यावर कुमार -

“नाही, अजून तरी नाही विसरलो आणि या चार वर्षात मला कळून चुकलं कि तुला विसरणं किमान याजन्मी तरी मला शक्य नाही.....”

एवढं बोलून तो थांबला... आता त्याला शब्द फुटेना, भावना अनावर होऊन हृदयात अनेक भूतकाळातील आठवणी ताज्या व्हायला सुरुवात झाली..

ती कुमारच्या जीवनात आली तोपासून तर शेवटी तिला जेव्हा पाहिले तोपर्यंतचे सारेकाही क्षणभरात, नभात तारा चमकून नाहीसा व्हावा तसे नजरेआड झाले. मन अति जड झाल्याने अश्रूसागर वाफ होऊन डोळयातून वाट शोधू लागला आणि तोच त्याने फोन ठेवला.....

आज पुन्हा इतक्या दिवस रोखून ठेवलेलं वादळ मनात उठलं अन स्वतःला तिच्याशी कधीच बोलायचं नाही असं दिलेलं वचन त्यानं तोडलं म्हणूनच तिच्या आठवणी आज एखाद्या शापित राखणदार म्हणून ठेवलेला धनावरच्या नागासमान त्याचा पाठलाग करीत होत्या. भूतकाळात तो इतका मग्न झाला की त्याचा फोन 10 ते 15 मिनिटांपासून एकसारखा वाजत होता हे त्याच्या लक्षात आलं नाही. तेव्हा तिच्या आठवणीत गुंग असतानाच त्याची दुचाकी रस्त्याच्या डाव्या बाजूकडून उजवीकडे जात असल्याचे त्याला कळलं नाही...

समोरून येणाऱ्या दुचाकीवाल्याने जोरात हॉर्न दिल्यावर तो जरा भानावर आला आणि दुचाकी सावरायला लागला तोच फोन वाजल्याचे समजताच त्याने मोबाईल बाहेर काढण्यासाठी खिश्यात हात घातला....

## २. घात कि अपघात?

कुमारने कुणी फोन केला ते पाहण्यासाठी मोबाईल हाती घेत दुचाकी चालवतच पाहू लागला, तर तिचे 7 सुटलेले कॉल त्याला मोबाईल मध्ये दिसले आणि पुन्हा त्याच्या मनात ती आणि तिच्या आठवणी, यांची गर्दी व्हायला लागली आणि तो हळूहळू वास्तव विसरून संपूर्णपणे तिच्या सोबत भूतकाळातील जगात वावरायला लागला, तसा कुमार आज सकाळपासूनच काहीसा बेचैन होता बहुतेक नियतीने तो दिवस आधीच ठरवून ठेवला असावा जसा इतरांसाठी ठरवलेला असतो वाईट किंवा छान।

कधी कधी नियतीने ठरवलेल्या संकटांना आपल्याला सामोरं जावं लागतं ज्यांना आपण घात म्हणतो तर कधी आपण स्वतःच संकट आपल्यावर ओढवून घेतो त्याला आपण अपघात म्हणतो पण हे सगळं विसरून एका वेगळ्याच दुनियेत तो सफर करायला लागला. कुमार वास्तवातून प्रत्येक क्षणाला आणखी दूर जात होता... भूतकाळात... अगदी जेव्हा प्रथम त्यानं तिला पाहिलं होतं......

जीवनाच्या त्या वळणावर तो पोहोचला जणू काही त्या क्षणापासून आता नव्याने जीवनाला सुरुवात होणार की काय असं त्याला वाटून गेलं...

तो पुन्हा एकदा जसेच्या तसे अनुभवत होता आणि थोड्याच वेळात अचानक सर्वकाही थांबलं..... कुमार रस्त्याच्या कडेला पडला होता....

नेमकं तिथं काय घडलं होतं? कुणालाही काहीएक समजलं नव्हतं. आता कुठे कुमार चार वर्षानंतर पुन्हा एकदा तिला आठवून तिच्यासवे तो जगत असल्याचे अनुभवत होता. पण चूक झाली इतकीच कि तो जीवनाचे सत्य विसरला.....

भुतकाळ परतीच्या प्रवासाचा सोबती नाही... तो एकदा ज्या वाटेवरून जातो त्या वाटेवर पुन्हा फिरकून सुद्धा पाहत नाही की आठवण हि काढत नाही,

हा स्वभावविशेष फक्त आपणा नश्वर मानवजातीला लाभला आहे. पण हे सर्व विसरून तो नकळत भूतकाळाच्या प्रवासाला निघाला होता पुन्हा त्याच वाटेवर चालायला लागला होता. जेव्हा कुमार तिच्या आठवणीत भान हरपून बसला, तेव्हा नियतीने आपला डाव साधला आणि कुमारचा घात केला.

## ३. अघटित

आता सर्व जागीच स्तब्ध झालं होतं. वाहनांची गर्दी आता रस्त्यावरून कुमार पडला त्याठिकाणी व्हायला लागली होती. सगळे लोक काय झालं? कसं झालं? एकमेकांना विचारत होते तर काही जवळ जाऊन त्याला बघत होते....

डोक्याला मार लागल्याने भळभळा रक्त वाहत होते. कुमार मात्र डोळे बंद करून पडून होता इतक्यात कुणीतरी फोन करून रुग्णवाहिका बोलावली...

काही वेळांत पोलीस हि अपघातस्थळी आले आणि पंचनामा करायला लागले सगळं कसं अचानक घडलं होत....

लोक आपसात कुजबुज करत होते...

कोण आहे हा तरुण? कसा घात केला नशिबानं ! काय होईल देव जाणे ! कुणी म्हणत होत खूप रक्त गेलं आहे काय माहित जगणार कि नाही? वाचला तर वाचला सुदैवाने...

एवढं असं चाललं असतांना ज्या ट्रक ने धडक दिली होती त्या ट्रकचा चालक तर केव्हाच फरार झाला हे कुणाच्याही लक्षात आलं नाही...

पोलिसांनी विचारणा केल्यावर तो पळून गेल्याचं कळालं... रुग्णवाहिका कुमार ला घेऊन  घेऊन जात होती आणि लोकांची गर्दी  हळूहळू कमी होत होती तर काही अजूनही तिथं नेमकं काय झालं? त्याचा विचार करत दुचाकी धडक लागल्यावर कशी बाजूला पडली ते न्याहाळत होते तेव्हाच कुणीतरी....

“अरे हा मोबाईल कुणाचा पडला इथे? ”

त्या गृहस्थाला या प्रश्नाचं उत्तर मिळालं नाही म्हणून त्याने तो मोबाईल पोलिसांना दिला...

“साहेब, बहुतेक त्या तरुणाचा आहे हा मोबाईल..”

आता सूर्य जवळजवळ मावळला होता, काहीशी पुसट प्रकाशकिरण फक्त तेवढी बाकी होती..... जसा कुमारचा शेवटचा श्वास, त्याच्या हृदयाचा शेवटचा

ठोकाच। तशी रस्त्यावरची गर्दी आता पूर्ण कमी झाली होती आणि सगळे आपल्या वाटेने निघाले होते...

थोड्या वेळापूर्वी घडलेल्या अघटित अपघाताने सर्व तिथे थांबलेले लोक मनात काही प्रश्न घेऊन घरी जात होते. तर पाखरांचे थवेही आज जरा उशिराच घरट्यात पोहोचले होते. कुमार मात्र रोजचा ठरलेला दिनक्रम सोडून आज न सांगताच नेहमीसाठी सर्व इथेच टाकून परतीच्या प्रवासाला निघाला होता की काय?

रुग्णवाहिका वेगाने दवाखान्यात पोहोचली, इमर्जन्सी वॉर्ड मध्ये लगेच कुमारला दाखल करण्यात आले, तिथे सर्वांची धावपळ सुरू झाली. डॉक्टर आपसात खूप रक्त वाहून गेलं असं म्हणत त्याला अतिदक्षता विभागाकडे घेऊन गेले आणि उपचाराला सुरुवात झाली......

काही वेळाने डॉक्टर पोलिसांना सांगायला लागले की रुग्णाची स्थिती खूप वाईट आहे आणि त्याची शुद्ध हरपली आहे अद्याप काहीएक सांगता येणार नाही. तरी तुम्ही त्याच्या कुटुंबियाना कळवा आपण थोड्या वेळाने भेटू।

आय शुड लिव्ह नाऊ. मे आय? असे म्हणत डॉक्टर आपल्या कामाला लागले आणि पोलीस आपल्या...

सूर्य मावळून दिवे लागण्याची वेळ झाली, चरायला गेलेली गुरं ढोरं सुद्धा जंगलातून घरी परत येऊन बराच वेळ झाला होता. आज खूप वेळ झाला पण कुमार अजून घरी न आल्याने त्याची आई दाराच्या पायरीवर उभी राहून दारासमोरून सरळ जाणाऱ्या रस्त्याकडे पाहत त्याची वाट बघत होती तर कुमारला अपघात झाल्याचं अजून पर्यंत घरी कुणालाच माहित नव्हतं आणि इतक्यात आवाराच गेट बाजूला सारत कुणीतरी आत आल्याचं तिला समजलं.....

तोवर ती घरातून बाहेरच्या पायरीपर्यंत ये-जा करत होती पण आता गेट सरकवल्याचा आवाज येताच तिला वाटलं की कुमार आला...

म्हणून त्याला रोजच्याप्रमाणे “आलास बाळ” एवढं विचारण्या जणू ती पायरी जवळ येऊन थांबली तर तिचा दुसरा मुलगा हातातील बॅट हवेत फिरवत समोर उभा होता. तू आहेस व्हय? मला वाटलं तुझा दादा च आला ती प्रशांत कडे पाहत म्हणाली...

त्यावर आई कडे पाहत तो विचारू लागला दादा अजून आला नाही आज? रोज तर 6 वाजताच घरी हजर असतो. आता तर 7 वाजत आले ! मी फोन करून बघतो त्याला का उशीर झाला ते, असं म्हणतच पायातील बूट काढत त्याने मोबाइल वरून भावाला फोन लावला तर कुमारचा फोन लागत नव्हता. त्यांना काय कल्पना कि कुमारला अपघात झाला.......

## ४. पूर्वकल्पना

प्रशांत पुन्हा पुन्हा फोन लावून पाहत होता पण त्याचा काहीएक उपयोग होत नव्हता.... सायंकाळचे 7 वाजून गेले आता रस्त्याच्या बाजूचे लाईट लागले

थोडा अंधार पडायला सुरुवात झाली होती आणि तिकडे दवाखान्यात इन्स्पेक्टर पाटील व कॉन्स्टेबल वानखडे कुमारचा मोबाइल सुरु करायचा प्रयत्न करत होते पण रस्त्यावर पडल्याने तो सुरु होत नव्हता म्हणून अद्याप त्यांना कुमारच्या घरी काहीही निरोप देता आला नव्हता..

प्रशांत फोन लावतच होता तर त्याची आई अजून कुमार का परतला नाही म्हणून व्याकुळ होऊन त्याची वाट पाहत होती आणि दर दोन मिनिटांनी दुचाकी आली काय दारात, कुमारला घेऊन पाहण्यासाठी ये जा करत होती शेवटी अधीर होऊन ती प्रशांतला म्हणाली....

त्याच्या कुणा मित्राचा नंबर असेल तर विचारून बघ कुठे आहे? किती वेळ लागणार घरी यायला? एवढं बोलून ती देवघरात जायला लागली अन वाऱ्याच्या हलक्या झुळूक वाहायला लागल्या आणि त्यांची गती वाढत जाऊन जोरदार वारा सुटला जणू अघटित घडल्याची पूर्वकल्पना तो देत होता तर कुमारची आई या वेळी

सर्वकाही विसरून देवघरात खाली बसून देवाला नमस्कार करून माझ्या मुलाला सुखरूप घरी येऊ दे म्हणत दिवा लावून मनोभावे पूजा करत होती ।

वारा जोरात सुरू असल्याने दिव्याची ज्योत कमी जास्त होत होती तर ती दोन्ही हात लावून दिवा विझणार नाही याची काळजी घेत होती. शेवटी आईचे मन हे आपल्या मुलासाठी इतरांपेक्षा जास्त तुटतं, काळजी करतं

आता तिला असंख्य विचारांनी विळखा घालायला सुरुवात केली होती कितीतरी विचार, प्रश्न तिला घेरा घालून होते तरी ती मन शांत ठेवण्याचा यत्न करत होती आणि देवापुढे लावलेला दिवा मोठ्या कष्टाने प्रकाशित ठेवू पाहत होती पण वाऱ्याचा वाढता ओघ त्या माऊलीची जणू परीक्षा घेत होता की तिला तिच्या मुलापासून आज नियतीनं हिरावून नेण्याचा डाव मांडला याची पूर्वकल्पना देत होता हे फक्त त्याला, सृष्टीला अन निर्मिकालाच ठाऊक होते असे सर्व सुरु असता प्रशांत चा मोबाईल वाजायला लागला....

खूप प्रयत्न करूनही कुमारचा मोबाईल सुरु होत नव्हता म्हणून सरतेशेवटी इन्स्पेक्टर पाटील यांनी कुमारचं सिमकार्ड स्वतःच्या मोबाईल मध्ये टाकलं आणि सिमकार्ड मधील पहिलाच नंबर डायल केला. तो नंबर होता प्रशांतचा....

प्रशांतच्या हातीच मोबाईल असल्याने त्याने लगेच कॉल घेतला...

“हॅलो दादा कुठे आहेस तू? आणि इतका उशीर का झाला आज? किती वेळ आहे अजून? ”

असे एकामागे एक प्रश्न त्याने विचारले...

असं मोबाइल वरच बोलणं ऐकून कुमारची आई लगेच बाहेर आली आणि त्याला विचारायला लागली

“काय म्हणाला तुझा दादा? किती वेळ आहे म्हणाला अजून घरी यायला? कुठे आहे तो आणि सोबत आहे का कुणी त्याच्या? ”

त्यावर प्रशांत उत्तरला - आई थांब थोडं ; दादाला बोलू तर दे मग सांगतो.

असा हा संपूर्ण संवाद पाटील यांनी ऐकला आणि त्यांना कळून चुकलं कि मोबाईल वर दुसऱ्या बाजूला अपघात झालेल्या तरुणाचा लहान भाऊ आणि आई बोलताहेत तेव्हा पाटील यांनी जास्त वेळ न घेता लगेच बोलायला सुरुवात केली.

“ हॅलो मी इन्स्पेक्टर पाटील बोलतोय.”

त्यापुढे पाटील काही बोलणार तोच प्रशांत मध्येच बोलला कोण इन्स्पेक्टर आणि सोबतच त्याची आई पण काय..? पोलीस? का बरं काय झालं आणि दादाचा मोबाईल तुमच्याकडे कसा काय? ”

पाटील म्हणाले शांतपणे आधी मी काय म्हणतो ते ऐकून घ्या. हा मोबाईल कुणाचा हेच शोधत आहोत आम्ही, कुणालातरी हा मोबाईल सापडला त्याने माणुसकी म्हणून पोलीस स्टेशनला जमा केला तेव्हा मी त्यासाठीच तुम्हाला फोन केला..... तर तुम्ही जास्त वेळ वाया न घालता जमेल तितक्या लवकर पोलीस स्टेशनला या. ठीक आहे समजलं तुम्हाला. बरं मी ठेवतो फोन. या तुम्ही. असं बोलून पाटील यांनी फोन ठेवला।

## ५. वास्तव अवास्तव

असं घाई घाईत बोलून लगेच फोन ठेवल्यामुळे प्रशांत आणि त्याच्या आईला अनेक प्रश्न पडायला लागले होते......

कुमार कुठे आहे? अजून घरी का आला नाही? त्याचा मोबाईल कुणाला आणि कुठे सापडला? नेमकं काय झालं असेल? तो ठीक तर आहे ना? वेळेचे भान ठेवून प्रशांत म्हणाला, आई तू काळजी करू नकोस... मी जाऊन येतो पोलीस स्टेशनला, तू घरीच थांब. बाबा पण लग्नाला गेले, यायचे आहेत अजून...

त्यावर आई त्याला म्हणाली...

“अरे शहराला आले असतील पण वाहन नसेल गावी यायला नाहीतर थांबले असतील मित्राकडे उशीर झाला म्हणून.”

एवढं बोलून ती थांबली. प्रशांत --“आई येतो मी”म्हणत जायला लागला..

“बाळा सोबत ने कुणाला अंधार झाला आहे खूप”

यावर नुसतं हो म्हणून तो पटकन घरातून बाहेर पडला आणि मित्राला सोबत घेऊन दोघे दुचाकीने शहराच्या दिशेने जायला लागले तर त्याची आई पुन्हा देवापुढं जावून दिव्यात तेल घालून पाया पडली आणि कुमारची वाट पाहायला लागली...

इकडे रुग्णालयात कुमार बेशुद्ध होऊन निपचित पडून होता. पायाला जखम झाली होती तर गुडघ्याला मार लागला होता, हाताला खरचटलं होतं.. डोक्याला खूप लागलं होतं, शर्ट रक्तानं माखलं होतं, डॉक्टरांनी मलमपट्टी करून सलाईन लावले...

प्रशांत मित्राला घेऊन शहराकडे जात होता, दिवसभर तापलेल्या उन्हाच्या झळा अजूनहि जाणवत होत्या, निरभ्र आभाळ असल्यानं चटक चांदणं दिसत होतं त्यामुळे रस्ता स्पष्ट दिसत होता म्हणून ते वेगाने जात असल्याने अवघ्या 15 मिनिटांत गाव आणि शहराला जोडणाऱ्या मूळ रस्त्यावर पोहोचले तोच त्यांना वळण घेतांनी कुणीतरी पायी गावात येत असल्याचे दिसले. दुचाकी चा वेग कमी करत त्यांनी जवळून पाहता ती व्यक्ती प्रशांतचे वडील असल्याचे त्यांना समजले...

दुचाकी थांबवून प्रशांत त्यांच्या जवळ गेला. त्यावर त्याचे वडील त्याला विचारत होते....

“प्रशांत तू आहेस का? अरे आता या वेळेला कुठं जात आहात? ”

त्यावर प्रशांत म्हणाला...

“बाबा आधी तुम्ही बसा गाडीवर मी वाटेत सांगतो सर्व”

“अरे हो पण काय झालं? कशाची गडबड आहे? सगळं ठीक आहे ना? ”

असं बोलत ते दुचाकीवर बसले आणि तिघेही शहाराकडे जायला लागले. प्रशांतने घडला प्रकार वडिलांना सांगितला....

इकडे रुग्णालयात कुमार जवळ अद्याप पाटील आणि वानखडे अतिदक्षता विभागाबाहेर बाकावर बसून होते....

“ एक विचारू सर? ”

वानखडे पाटील यांना म्हणाले...

त्यावर” हं”एवढंच पाटील बोलले....

“तुम्ही या तरुणाच्या कुटुंबियांना अपघातचं का नाही सांगितलं..?

का अपघात झाल्याचं न सांगता मोबाईल सापडला असं अवास्तव बोललात? ”

वानखडे यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देत पाटील म्हणाले...

“याच असं आहे वानखडे कि, मी जेव्हा फोनवर बोलत होतो तेव्हा मला समजले की दुसऱ्या बाजुला या तरुणाचा लहान भाऊ आणि आई बोलत होते म्हणून वास्तव लपवून मला अवास्तव सांगावं लागलं नाहीतर त्याच्या आईने अनावर होऊन तेव्हाच शोकारंभ केला असता”

असं बोलणं सुरु असतांना डॉक्टर  कुमारला तपासण्यासाठी आत गेले आणि तो अजून शुद्धीवर न आल्याने लगेच बाहेर आले....

पाटील डॉक्टर बाहेर येताच -

“हॅलो डॉक्टर, कसा आहे तो? काही सुधारणा आहे का? ”

त्यावर डॉक्टर म्हणाले..

“नाही, अजून त्याला शुद्ध आलेली नाही. काही रिपोर्ट यायचे आहेत तेव्हा रिपोर्ट आल्यावर परिस्थिती कळेल. बरं त्याच्या कुटुंबियापैकी कुणी आलं नाही अजून? ”

त्यावर “ हो येत आहे.” पाटील म्हणाले..

आणि ठीक आहे म्हणत डॉक्टर निघून गेले...

इकडे प्रशांत त्याच्या वडील आणि मित्रांसोबत शहराला आला होता तोच त्याचा फोन वाजायला लागला...

दुचाकी बाजूला घ्यायला सांगत -

“हॅलो कोण? ”

“मी इन्स्पेक्टर पाटील बोलतोय “

“हॅलो सर, आम्ही पोहचलो शहरात 10 मिनिटात स्टेशनला येतो.”

पाटील म्हणाले “ कुठे आहे तू सध्या? ”

“बस स्टॉप जवळ आहे सर.” प्रशांत म्हणाला.....

“बरं, तुला जिल्हा रुग्णालय माहित आहे काय? मी तिथंच आहे आता. कामानिमित्त आलो आहे तू ये इथंच, शिवाय पोलीस स्टेशनपेक्षा जवळ आहे बस स्टॉपवरून.” पाटील म्हणाले।

त्यावर “ठीक आहे सर” प्रशांत म्हणाला आणि ते रुग्णालयाकडे निघाले....

वानखडे तेवढ्यात दोघांसाठी चहा घेऊन आले, दोघांनी चहा घेतला. पाटील म्हणाले...

“वानखडे मी त्या अपघात झालेल्या तरुणाच्या भावाला आणि सोबत जे कुणी असेल त्यांना इथंच बोलावून घेतलं आहे तर तू त्यांना गेटपासून आत घेऊन ये, बस! येतीलच ते इतक्यात.”

त्यावर हो सर म्हणत वानखडे गेटच्या दिशेने जायला लागले, आता अपघात होऊन जवळपास दीड ते दोन तास लोटून गेले होते...

आजूबाजूला बरेच लोक आपल्या रुग्णाजवळ डोळयात थोडी आस अन थोडी आसवं घेऊन भिंतीचा आधार घेत बसलेली.... पाटील पाहत होते....

आणि त्यांच्या मनात आले की इतक्या वेळेपासून या तरुणाचा अपघात झाला त्यात जवळ नात्याचं कुणीच नाही, बेशुद्ध अवस्थेत तो पडून आहे काही बरं वाईट होऊ नये म्हणजे झालं..... अनेक विचार मनात येत असल्यानं अस्वस्थ होऊन पाटील अतिदक्षता विभागाच्या काचेतून कुमारला पाहू लागले....

## ६. परिचय

काय वेळ आली या तरुणावर! चांगला 23-24 वर्षाचा तरुण, घरची जबाबदारी त्याने घेतली असावी... असे विचार मनात येत असता पाटील कुमार काही हालचाल करतो काय ते पाहत होते पण अजून तो तसाच बेडवर बेशुद्ध अवस्थेत पडून होता.... इतक्यात वानखडे यांनी हाक दिली 'सर'...

मागे वळून पाहिले तर दोन तरुण आणि पन्नाशीच्या जवळ वय असणारा गृहस्थ तिथं आलेले त्यांना दिसले. तेव्हा वानखडे परिचय करून देत-

'हे इन्स्पेक्टर पाटील'

त्यावर प्रशांत म्हणाला...

“नमस्कार सर, मी प्रशांत हे माझे वडील आणि हा माझा मित्र अक्षय”

पाटील यांनी वानखडेला - “जरा चहा बोलवा” म्हणत त्या तिघांना समोरच्या बाकावर बसायला सांगितले आणि झालेल्या अपघाताची बातमी दिली....

अपघात झाला कळताच कुमारचे वडील वास्तवाचं भान हरवून...

कसा झाला अपघात? कुठे झाला? कसा आहे तो? फार लागलं तर नाही? असे प्रश्न डोळ्यातील आसवं रोखून विचारू लागले...

न राहवून प्रशांत-

"सर, तुम्ही तर फोनवर काही वेगळंच सांगतिल होतं, की दादाचा मोबाईल सापडला म्हणून कुणालातरी"

त्यावर पाटील म्हणाले "तुम्ही आधी शांत व्हा. मला तुम्हाला फोनवर असं सांगणं ठीक न वाटल्याने मी इथं आल्यावर अपघात झाल्याचं सांगितलं. बरं, चला डॉक्टरला भेटू"

असा संवाद करत ते डॉक्टरला भेटायला गेले. "आम्ही आत येऊ शकतो? "असं दार जरा लोटून पाटील यांनी विचारले.

"हो, या पाटील साहेब" म्हणून डॉक्टरांनी आत यायला परवानगी दिली. आत येताच पाटील यांनी डॉक्टरला त्यांचा परिचय करून दिला.

त्यावर डॉक्टर म्हणाले तुम्ही प्लिज बसा तुमच्या मुलाचं नाव काय?

'कुमार'... , कुमारचे वडील बोलले.

“कसा माझा मुलगा? काय झालं त्याला? ”

कुमारला जास्त कुठे लागलं नाही. त्याच्या डोक्याला जखम झाल्याने रक्त खूप गेलं कि काय, त्यामुळे त्याला अजून शुद्ध नाही, शिवाय त्याच्या पायाला आणि हाताला मार लागला...

आम्ही त्याचं आणखी थोडा वेळ निरीक्षण करणार आहोत जर लवकर त्याला शुद्ध आली नाही तर त्याच्या मेंदूचे x-ray आणि सिटी स्कॅन करावे लागेल।

एवढं बोलून डॉक्टर थांबले..

“ आम्ही त्याला पाहू शकतो का? डॉक्टर साहेब”

त्याचे वडील म्हणाले...

त्यावर होकार देत त्याच्या खांद्यावर हात ठेवून काळजी करू नका असे म्हणत डॉक्टर अतिदक्षता विभागाकडे त्यांना घेऊन गेले. कुमार मात्र अजूनही तसाच पडून होता त्याचा भाऊ जवळ जाऊन

“ दादा काय झालं हे? उठ ना दादा,”

तर त्याचे वडील त्याचा हात हाती घेऊन

“ बाळा, बोल रे काही, असं कस झालं? ”

म्हणत आतापर्यंत रोखलेले आसवं ढाळायला लागले.....

प्रशांत आणि त्याचे वडील यांची ती अवस्था पाहून... आकाश आणि पाटील यांनी आधार देत त्यांना तेथुन बाहेर आणले...

पाटील त्यांना सांभाळत - “शोक आवरा, जरा सांभाळा स्वतःला. असं खचून कस चालेल? बसा इथे” म्हणत त्यांना बाकावर बसविले, त्यांना पाणी दिले.

आता ते दोघेही थोडे सावरले होते. आकाश प्रशांतजवळ बसून त्याला धीर देत म्हणाला “आपण काकुला सांगायला पाहिजे त्या काळजी करत असतील” तेव्हा त्याला घरून बाहेर येतेवेळी आईचा केविलवाणा चेहरा आठवला आणि तो रडतच म्हणाला.

“आईला कस सांगायचं कि दादाला अपघात झाला म्हणून, तिची काय अवस्था होईल असं ऐकून, मला तर कल्पनाही करता येत नाही.”

“तू काळजी करू नकोस मी आहे ना. तू बस इथेच मी आलोच” असं म्हणून आकाश समोरच्या गॅलरीत आला आणि त्याने एक नंबर डायल केला.....

काही क्षणातच दुसऱ्या बाजूने - “हॅलो बोल आकाश कसा आहेस? ”

त्यावर आकाश बोलू लागला, “मी ठीक आहे पण एक वाईट बातमी आहे सुजित तुझ्यासाठी....”

“काय मस्करी करतोस, कोणती वाईट बातमी? जरा नीट सांगतोस का” सुजित म्हणाला.

“अरे कुमारला अपघात झाला आहे” आकाश अडखळत बोलत होता

“काय! कुमारला अपघात झाला? कधी? कुठे? आणि कसा? तूला कुणी सांगितलं? सुजित बेचैन झाला होता.

आता आकाश अस्वस्थ होऊन बोलू लागला “अरे तू काकुला म्हणजे कुमारच्या आईला काही कारण सांगून जिल्हा रुग्णालयाला घेऊन ये लवकर, मी तुला नंतर सर्व सांगतो, बरं ठेवतो मी फोन.” असं म्हणून त्याने फोन ठेवला.

पण आता विचारांचे वादळ सुजितच्या मनात उठले होते, अचानक आकाशचा फोन आणि कुमारचा अपघात यामूळे तो सुन्न झाला होता. मग लगेच भानावर येत त्याने “मी येतो आई.” म्हणत दुचाकी घेऊन कुमारच्या घरी आला आणि बाहेरूनच आवाज देऊ लागला...

“काकू, अहो काकू, काय करत आहात? ”

आतापर्यंत देवघरात बसून देवाला गाऱ्हाणं सांगणारी ती माउली बाहेर येऊन म्हणाली...

“कोण? अरे सुजित तू आहेस, पण कुमार नाही घरी, अजून आला नाही तो, काय माहित कुठे आहे? ”

तेव्हा सुजित जास्त वेळ न घालवता म्हणाला “काकू, चला मी तुम्हाला घ्यायला आलो आहे. मला प्रशांतचा फोन आला होता, तुम्हाला घेऊन शहराला बोलावलं आहे, काम आहे म्हणाला.”

पण तो गेला आहे ना माझं काय काम आहे तिथं आणि तुझे काका पण नाही आले अजून काही सांगितलं का प्रशांतनं?

त्यावर सुजित “नाही, काकू तुम्ही चला सोबत लवकर बोलावलं आपल्याला” कसंबसं सावरून तो बोलला मग वाद न घालता दोघेही शहराच्या दिशेने जायला लागले......

## ७. आसवांची परीक्षा

गावातून बाहेर जात असता रस्त्यावरचे दिवे मनात येणाऱ्या विचारांसारखे एका मागून एक मागे जात होते. मनात असंख्य प्रश्न डोकं वर काढू पाहत होते, नेमकं काय झालं असेल कुमार सोबत? असा अचानक अपघात झाला कसा? फार लागलं तर असेल ना त्याला? परमेश्वरा कुमारला काही होऊ देऊ नकोस. असं मनात सुरु असता सुजित आणि कुमारची आई शहराकडे जायला निघाले....

या सर्व प्रकारापासून अलिप्त; त्याच्या आईला मात्र याचा अजून थांग पत्ता नव्हता, चंद्र आणि चांदण्यांनी रस्ता प्रकाशमान होता जणू त्याच्या वाटेत कोणताही अडथळा येऊ नये म्हणून कि काय? बराच वेळ दोघंही शांत होते. त्यासाठी दोन कारणं होती पहिलं असं कि रात्रीची वेळ त्यात दुचाकीचा प्रवास आणि दुसरं असं कि सुजितला पेच पडलेला कि बोलता बोलता काकूंना जे कळायला नको ते कळेल कि काय?

आतापर्यंत आसवांनी ओल्या पापण्या कश्या तरी त्याने लपविल्या होत्या पण मनात प्रत्येक क्षणाला येणारे विचार हे आसवं लपविण्यापेक्षा जास्त त्रास देत होते... रस्ता मोकळा असल्याने विचारांना आवर घालून त्याने दुचाकीचा वेग वाढवला कधी रुग्णालयात जातो आणि कुमारला पाहतो असं त्याला वाटत होतं...

तेव्हा “अरे सुजित हळू चालव” म्हणत कुमारच्या आईने त्याच्या खांद्यावर हात ठेवला, क्षणात सर्व वाईट विचार त्याच्या मनातून निघून गेले....

परिस्थिती कशीही असो मायेनं कुणी खांद्यावर किंवा पाठीवर हात ठेवला कि बरं वाटतं... एक आधार मिळतो... अस्वस्थ मनाला नवीन उमेद मिळते संकटांशी दोन हात करायला.

मी असं भान हरपून जायला नको, कुमार माझा जिवलग मित्र आहे मला तो भाऊ मानतो मग यावेळी काका, काकू व प्रशांतला मी आधार दयायला हवा तर मी स्वतः खचून जात आहे. मी आपल्या मैत्रीची जबाबदारी निभावणार, तुझ्यासाठी वाटेल ते करणार, मी येत आहे कुमार! असे विचार करत तो केव्हा रुग्णालयाला आला त्याला कळलं नाही. पण लक्षात येताच त्याने दुचाकी थांबवून-

“काकू, उतरा पोहोचलो आपण” सुजित म्हणाला.

“अरे पण हे कुठे आलो आपण? प्रशांत तर पोलीस स्टेशनला जातो म्हणाला होता” कुमारची आई म्हणाली.

“हो काकू, पण इथे बोलावलं प्रशांतने”

असं सांगून तो पायरी चढू लागला..

“अरे पण हे तर रुग्णालय आहे इथे कशाला बोलावलं? ” ती म्हणाली अन जणू तिला अस्वस्थ वाटून गेलं होतं की काय ती जड पावलांनी पायऱ्या चढत होती आणि तिचे प्रश्न टाळण्यासाठी वास्तविकता लपवून ठेवण्यासाठी तो एक पायरी समोर राहण्याचा प्रयत्न करत होता...

आत प्रवेश केल्यावर तिथल्या लोकांचे आशेने अन आसवांनी भरलेले डोळे पाहून जणू तिला हि वास्तव्याचा स्पर्श झाला असावा..... आता दोघेही पायऱ्या चढून आत येताच त्यांना कोणत्या वेगळयाच दुनियेत आल्याचं जाणवलं. आजूबाजूला नजर फिरवली तर रुग्णालयात मंद उजेड देत लाईट भिंतीला लागून असलेल्या बेडवर हवा तितकाच प्रकाश देत होते तर भिंतीची रंगसंगती पाहून त्या दुनियेचं वेगळपण कसं जपून ठेवलं जातं याची जाणीव होत होती....

भिंतीच्या खालील बाजूचा चौथा हिस्सा गर्द कथ्था तर उर्वरित भाग पांढरा रंग लावून चकाचक करून किती काळ लोटला ते फक्त त्या भिंतींना व त्या रंगालाच ठाऊक असेल. सुजित अजूनही जरा अंतर ठेवून समोर चालत होता. कुमारची आई आजूबाजूला पाहत त्याच्या मागे जात होती, तोच तिची नजर समोरच्या बेडवर अपघात झालेल्या तरुणावर पडताच तिला हृदयाचा ठोका चुकल्यासारखं वाटलं आणि आणखी काही वेदनेने त्रस्त झालेले रुग्ण पाहता न राहवून तिने पुन्हा सुजितला प्रश्न विचारला...

“अरे, सुजित मला कळत नाही प्रशांतने आपल्याला इथे का बोलावलं? तू माझ्यापासून काही लपवत आहेस का? कुमार ठीक तर आहे ना? ”

काय उत्तर द्यावं या प्रश्नांच हा प्रश्न त्याला पडला. आतापर्यंत रोखून ठेवलेले आसवं पापण्यांचा बांध मोडून गालावरन खाली येत होते. आता काय बोलावं त्याला काही सुचत नव्हतं. काय बोलाव आणि कसं बोलावं? त्याला काहीएक कळत नव्हतं.

आता तो जरा थांबून मोबाईल बाहेर काढत म्हणाला “काकू, मी प्रशांतला फोन करून बघतो कि तो कुठे आहे? ”

तो त्याला फोन लावणार इतक्यात त्याच्या डाव्या बाजूला पाण्याची बॉटल घेऊन येतांनी आकाश दिसला. मग सुजित मोबाईल परत खिश्यात घालत तिथेच थांबला. काकू, हा बघा आकाश येत आहे इकडेच, हळूच म्हणाला. जवळ आल्यावर आकाश त्या दोघांना-

“कधी आले तुम्ही? चला थोडं समोर जायचं आहे अजून.”

म्हणत तो कुमारच्या आईला टाळण्याचा प्रयत्न करत होता त्यावर घाईतच सुजित म्हणाला

“अरे बस, आत्ताच आलो आम्ही. प्रशांत कुठे आहे? ”

यावर “आहे ना इथे” असं म्हणत तो तसाच चालत होता.

काही मिनिटातच ते प्रशांत आणि त्याचे वडील जिथे बसले होते त्याठिकाणी पोहोचले. आता खरी आसवांची परीक्षा सुरु होणार होती कारण आतापर्यंत लपवून ठेवलेली वास्तविकता तिला कळणार होती तर तिला सांगणार कोण? हा एक प्रश्न तिथं वाटेत उभा होता... आईला घेऊन येत दिसल्याने प्रशांत आधीच खचून गेला त्याच्या तळ हातापायाला घाम सुटला तर हृदयाची धकधक वाढली. ती जवळ येताच तिचा हात धरून जवळ बसवत तो म्हणाला

“आई... आई.. दादा.. दादाला अपघात झाला.”

प्रशांतचं ते वाक्य ऐकून ती भान हरपून कुमार.. कुमार.. असं नाव घेत अनावरपणे शोक करत होती. कुठे आहे माझा कुमार? काय झालं त्याला? कसा झाला अपघात? असे प्रश्न विचारत ती टाहो फोडत होती. सुजित, आकाश तिला “काकू, सांभाळा स्वतःला रडू नका बरा होईल कुमार म्हणत दिलासा देत होते काकू, पाणी घ्या बरं तूम्ही”

प्रशांत काय करत आहे तू? आईला सांभाळायचं तर तुही रडत आहे! असं खचून कस चालणार, सुजित त्याला सांगत होता. कुमार आणि सुजित जिवलग मित्र होते. भावासारखे राहत असल्याने सुजित त्या दोघांना समजावीत होता तर इकडे बाजूच्या भिंतीला टेकून, आता जसा त्या भिंतीचा आधार घेऊन स्वतःला सावरण्याचा प्रयत्न  कुमारचे वडील करत होते, शेवटी परिस्थिती काहीही असो वडील मनातलं वादळं रोखून असतात ते स्वतःला खचून गेल्याच इतरांना दाखवत नाहीत पण कुमारने जबाबदारी घेतल्यापासून त्यांनाही आता काळजी वाटतं नव्हती, आता कुठे, त्यांना थोडी सवड मिळायला लागली होती पण नियतीला कदाचित हे मान्य नव्हतं....

कुमारची आई काही रडणं थांबवत नव्हती आणि मला कुमार जवळ घेऊन चला. म्हणत होती काय केलं हे परमेश्वरा? तुला काय कमी केलं मी?

अशी तक्रार करत होती, आसवं ढाळत होती.

सर्व तिला समजावत होते... सावरायला सांगत होते... पण आईच मन काही केल्या आवरत नव्हतं... ती कुमारला साद घालत होती.... कुमार.... कुमार... म्हणत प्रशांतला जवळ घेऊन आसवं ढाळीत होती...

## ८. कुमारची डायरी

बराच वेळ असं सुरु असताना डॉक्टर कुमार शुद्धीवर आला की नाही? आता त्याची तब्येत कशी आहे? तसेच काही सुधारणा आहे की नाही यासाठी कुमारला पाहायला आले असता कुमारची आई डॉक्टरच्या समोर आली.....

“ साहेब, मला माझ्या कुमारला भेटू द्या, त्याला पाहू द्या, आज सकाळी 10 वाजता घरून गेला तेव्हापासून मी त्याचा चेहरा बघितला नाही...”

ती डॉक्टरला विनवणी करत होती त्यावर डॉक्टर “मी आत जाऊन बघुन येतो कि त्याला शुद्ध आली कि नाही तोवर तुम्ही कृपया इथेच थांबा” असं म्हणून डॉक्टर आत गेले. त्यांच्या मागेच जात ती दाराजवळ उभी राहून तिच्या मुलाला काचेतून पाहत होती.

ती आता कुठे रडणं थांबवून बोलायला लागली होती. पुन्हा कुमारला त्या अवस्थेत पाहून शोकारंभ करेल म्हणून प्रशांत तिच्या जवळ जाऊन

“आई, बाकावर बस डॉक्टर बाहेर आले की सांगतील दादा कसा आहे ते”

पण ती माउली अजून तिथेच उभी राहून डॉक्टर बाहेर येण्याची वाट पाहत होती तर डॉक्टर कुमारचं बारकाईने निरीक्षण करत होते. कुमार काही हालचाल करतो काय? ते पाहत होते सलाईन संपली होती पुन्हा एक सलाईन त्यांनी लावली.

अजून कुमारने काहीएक प्रतिक्रिया न दिल्याने हाता पायाच्या मलमपट्टी ठीक करून डॉक्टर बाहेर येत.... आपसात कुमारच्या डोक्याचं सिटीस्कॅन आणि x ray काढावा लागेल असं बोलत आतून बाहेर आले.

ते बाहेर येताच त्यांची वाट पाहत दाराजवळ उभी असलेली त्याची आई विचारायला लागली "कसा आहे माझा कुमार? काय झालं त्याला? "

तिच्या निरागस चेहऱ्याकडे नजर टाकली तर तिला कसं सांगावं कि कुमारची तब्येत अजूनतरी ठीक नाही हाच प्रश्न त्यांना पडला होता मग जरा आधार देत डॉक्टर म्हणाले, "तुम्ही काळजी करू नका. तो बरा होईल."

"डॉक्टर मी बघू का त्याला जवळून एकदा? " ती विनवणी करत होती.

त्यावर "जास्त वेळ कुणीही आत थांबू शकत नाही." म्हणत डॉक्टरांनी तिला होकार दिला. तसेच डॉक्टरांनी नर्सलाही सांगितले मग सर्व कुमारला बघण्यासाठी आत गेले. कुमारला त्या अवस्थेत पाहून सर्वांच्या डोळयातून अश्रू वाहायला लागले, त्याची आई तर त्याला बिलगून रडायला लागली तेव्हा तिला कुमार पासून बाजूला सारत बाहेर आणण्याचा प्रयत्न सगळे करत होते पण ती जास्त अनावर होऊन त्याला साद घालत होती...." कुमार उठ बाळा, बघ माझ्याकडे, काय झालं हे? कुमार.. कुमार......"

शेवटी सर्वांनी मिळून तिला अतिदक्षता विभागातून बाहेर आणून बाकावर बसवलं. प्रशांतनं आणि कुमारच्या वडिलांनी तिला समजावत पाणी दिले. तेवढ्यात

इंस्पेक्टर पाटील पोलीस स्टेशनहून हातात कुमारची बॅग आणि टिफिन घेऊन परत आले.

इन्स्पेक्टर पाटील यांनी पोलीस स्टेशनला जावून अपघात झाला तेव्हा तिथे मिळालेल्या वस्तू गोळा करून पंचनामा पूर्ण केला होता तेव्हा  कुमारची बॅग आणि टिफिन घेऊन ते परत रुग्णालयाला आले. बॅग आणि टिफिन प्रशांतला देऊन ते डॉक्टरला भेटायला गेले. प्रशांतने बॅग व टिफिन हाती घेऊन बाजूला ठेवले.......

आता सर्व शांतपणे बसले होते पण कुमारचं काय होईल याचीच चिंता सर्वांना लागली होती. कुमार अजूनही जसाचा तसा होता म्हणून रात्रीला थांबावं लागणार होतं आणि आकाश व सुजीतने आपल्या घरीसुद्धा रुग्णालयाला आल्याचं सांगितलं नव्हतं म्हणून त्यांनी घरी फोन करून कुमारच्या अपघाताचं आणि तब्येत खूप खराब असल्याने रात्रीला इथेच थांबणार असल्याचं सांगून सर्वांसाठी जेवणं बोलावलं होतं, खरं तर कुणालाही जेवणाची मुळीच ईच्छा नव्हती पण कुमारच्या कुटुंबीयांचा विचार करून त्यांनी घरून टिफिन बोलावले होते आणि कुमारच्या वडीलांना हि जरा समवस्कांची सोबत होईल म्हणून सुजित आणि आकाश यांचे वडिल तिथे येत होते असा फोनवरचा संवाद संपवून ते प्रशांत, त्याच्या आई वडील जवळ बसून त्यांना धीर देत होते तेवढ्यात डॉक्टर आणि इन्स्पेक्टर तिथं आले... सर्वजण उठून उभे झाले....

ते जवळ येताच सर्वजण त्यांच्या समोर उभे राहून डॉक्टर काय म्हणतात ते ऐकण्यासाठी आतुर होते, त्यांच्याकडे नजर फिरवत कुमारच्या वडील आणि आई कडे नजर रोखून पाहत डॉक्टर  म्हणाले, “जरा केबिनमध्ये चला, मला तुम्हाला काही सांगायचं आहे” आणि सर्व केबिनमध्ये गेले तेव्हा कुमारच्या डोक्याचा x ray दाखवत डॉक्टर सांगत होते.

“हे पहा, डोक्याचा खालच्या बाजूला मार लागल्याने येथून रक्त वाहत होत आणि रुग्णालयात येईपर्यंत रक्त गोठून त्याठिकाणी मासपेशींची गाठ पडली त्यामुळे आणि खूप रक्त गेल्याने अशक्त होऊन कुमार असा निपचित पडून आहे तेव्हा ऑपरेशन करावे लागेल. सिटी स्कॅनचा रिपोर्ट आल्यावर मी तुम्हाला कळवतो”

त्यावर कुमारचे आई वडील कुमार बरा होईल ना? डॉक्टरसाहेब असे विचारत होते... तेव्हा आम्ही पूर्ण प्रयत्न करू म्हणत डॉक्टर ऑपरेशन कधी करायचं ते मी सकाळी आल्यावर सांगतो म्हणाले. असा संवाद संपताच सर्व बाहेर पडले एकदा पुन्हा दुःख नव्याने बोचल्याचं त्यांना जाणवलं. काही वेळानंतर सुजित आणि आकाशचे वडील, नातेवाईक तसेच इतर काही शेजारी कुमारला पाहण्या साठी आले. तर प्रश्नांना सुरुवात झाली होती सर्वजण कुमारच्या कुटुंबाला धीर देत होते।

असं सगळं घडत असताना धक्का लागल्याने बाकावर ठेवलेली कुमारची बॅग खाली पडली. ती उचलून ठेवायला सुजितने बॅग हाती घेतली तर अपघाताने बॅगहि

फाटल्याचे त्याला दिसून आले. तेव्हा हातानेच झटकून परत वर ठेवतांना बॅगच्या आतून काहीसं जाड कवर असलेलं बाहेर लोंबकळतांना त्याला दिसलं. बॅगची चैन उघडून पाहताच त्याला आत काळया रंगाचे कवर असलेलं छोट्या नोटबुकासारखं काही असल्याचं दिसलं. इकडे सर्व आपसात बोलत असल्यामूळे सुजीतकडे कुणाचंच लक्ष नव्हतं. शेवटी न राहवून त्याने ते नोटबुकासारखी दिसणारी वस्तू बॅगच्या आतच उघडून पाहता त्याला नवल वाटलं की इतक्या वर्षापासून ते दोघे मित्र असून त्याला त्या वस्तूबद्दल काहीही माहीती नव्हतं तर कुमारने स्वतःहून कधी त्या वस्तूबद्दल सांगितल्याचे त्याला आठवत नव्हतं. तेव्हा ती वस्तू काय आहे हे माहिती करून घ्यायला पाहिजे असं वाटून सुजित आजूबाजूला कुणी पाहात तर नाही ना? याची खात्री करत ती बॅग घेवून जरा आडोश्याला गेला आणि ती वस्तू बाहेर काढून पाहिली तर ती डायरी असल्याच त्याला समजलं. मग भिंतीचा आधार घेत त्याने ती डायरी उघडली, त्याला जणू आश्चर्याचा धक्काच बसला, कुमार आणि तो जवळ जवळ 12 ते 14 वर्षापासून मित्र असून... कुमार डायरीत काही लिहीत असल्याचं त्याला अजून माहित नव्हतं आणि नवल या गोष्टीच कि त्याला याबद्दल साधी कल्पनाही कधी कुमार दिली नाही की कधी चुकून डायरी लिहीत असल्याचा विषय कुमारने त्याच्यासोबत काढल्याचा त्याला आठवत नव्हतं...

थोडक्यात इतक्या दिवसांपासून जिवलग मित्र असून, डायरीचं गुपित हे त्याला माहित नव्हतं....

## ९. डायरीचं गूढ

कुमारला आपण पूर्ण समजलो नाही.... निदान जिवलग मित्र या नात्याने तरी... असं सुजितला वाटून गेलं... काय लिहलं असेल त्यानं यामध्ये आणि कुणाबद्दल? मनात असे विचार येत असता त्याने डायरीचं पहिलं पान उघडलं तर पहिल्याच पानावर गर्द लाल रंगाने

"मला काही सांगायचंय"

असं मोत्यासारख्या सुंदर अक्षरात एखाद्या पुस्तकाचं नाव लिहावं तसं लिहलं होतं.... मग या डायरीत काय गुपित दडलं आहे हे पाहण्यासाठी सुजित पान पालटून वाचत होता...

दोन तीन पान वाचून झाली न झाली तोच त्याचा फोन वाजायला लागला आणि डायरीच्या पानात बोट ठेवत त्याने फोन घेतला तर

"अरे, सुजित कुठं आहे तू? "

त्याचे वडील विचारत होते.

"बाबा मी इथेच आहे बाजूला तुम्ही कुठं आहात?" त्याने विचारले

“मी कुमारच्या आई वडीलाजवळ आहे” त्याचे बाबा म्हणाले.

त्यावर “आलोच मी” म्हणत त्याने फोन ठेवला. आता त्याला ती डायरी पूर्ण वाचून घ्यावी असं वाटतं होत पण नाईलाजाने त्याला ती तशीच परत बॅग मध्ये ठेवावी लागली आणि मागे बॅग ठेवत तो त्याच्या वडीलांजवळ जाऊ लागला....

जाता जाता हळूच ती बॅग त्याने जवळच्या भिंतीला टेकवून दिली “काय म्हणत होता बाबा तुम्ही?”

“अरे खूप वेळ झाला... टिफिन आणला आहे आम्ही, तुमच्यासाठी घरून... तर सोबत दोन दोन घास जेवून घ्या तुमच्यासोबत तरी निदान जेवतील ते....

सुजीतचे वडील त्याना सांगत होते कि खूप म्हटलं..

पण ते भूक नाही म्हणत शोक करत आहेत काय अवस्था झाली त्यांची रडून रडून.... म्हणून फोन केला तुला आणि आकाशला पण बोलावं जेवण करायला असं म्हणत ते कुमारच्या वडिलांना धीर देत 'चला जेवून घ्या बरं' म्हणत खाली बसविले....

बराच वेळ समजाविण्यात गेला आणि मोठ्या प्रयत्नाने त्यांनी कुमारच्या आई वडिलांना आणि प्रशांतला थोडं जेवू घातले. रुग्णालयात तसेच कुमारची ती अवस्था पाहिल्याने भूक तर नव्हतीच पण आजूबाजूचं वातावरण आणि औषधनांचा दर्प यामुळे घास तोंडातच फिरत होता कसेतरी दोन चार घास सोबत जेवून सर्व उठून बसले आणि जुंन्या कुमार लहान असल्यापासूनच्या गप्पा सांगत त्याची आई रडत होती तर प्रशांत, आकाश, सुजित जवळ जवळ बसून कान देवून ऐकत होते...

कुमारच्या बालपणीच्या खोडकर गोष्टी, शाळेत असताना शिक्षक त्याच कौतुक करायचे ती सांगत होती तेव्हा जणू तिथ उपस्थित प्रत्येकाला त्याच्या आठवणीतला कुमार मनात कुठेतरी जागा होत होता तर वास्तविक पाहता तो अजूनही बेडवर तसाच झोपला होता. बऱ्याच वेळ गप्पा सुरु होत्या मग हळूहळू शेजारी घरी जायला लागले आणि पुन्हा शांतता पसरली. सुजित आणि आकाशचे वडील तिथंच थांबले होते..... मध्येच कुणी उठून कुमारला जाग आली काय ते पाहण्यासाठी दाराजवळ जाऊन बघत होते, निराश होऊन परत येत होते..

शेवटी काहीही होवो पण जगण्याची  आस प्रत्येकाला असतेच अगदी शेवटचा श्वास असेपर्यंत..... पण इथे पुढल्या क्षणाला समोर काय मांडून ठेवलं आहे याची कल्पनाही नसते कुणाला तरी आपण मी, माझं आणि मीपणा बाळगून असतो... आपल्या या नश्वर शरीराला अन दुनियेला सदैव एकाच नजरेने पाहत असतो. मला हे करायच आहे... असंच करायचं आहे.... काहीही झालं तरी काय वाट्टेल ते करावं

लागलं तरीही... असं आपण मनात ठरवून असतो आणि अचानक अगदी अतिचंचल वाऱ्यालाही कळू न देता काळ आपली भूमिका बजावत कधी आपले प्राण हिरावून नेतो कळत नाही.... असं विचारचक्र मनात सुरु असताना सुजित भानावर येऊन दुसऱ्या क्षणाला त्याला डायरीचा विचार मनी आल्याने तो बॅग कुठं ठेवली ते आठवायला लागला आणि त्याच्यापासून थोड्या अंतरावर बॅग असल्याची त्याला दिसून आली... पण सर्वजण जागीच असल्याने त्याला त्या डायरीत काय काय गूढ आहे? असा प्रश्न स्वतःला विचारत योग्य वेळेची वाट पाहण्याशिवाय दुसरा पर्याय मिळत नव्हता, शिवाय जर मलाच ठाऊक नव्हतं डायरीबद्दल ते बाकी अजुन कुणाला माहिती असणे अशक्य आहे हे तो जाणून होता..

आता बरीच रात्र झाली होती पण कुणाच्याही डोळयावर झोप येत नव्हती. सुखात वेळ कशी निघून जाते कळत नाही तर दुःखात तीच वेळ कधी एकदा रात्र संपून दिवस उजाडेल याचाच विचार आपण करत असतो.... का झालं असं? आताकुठे कुमारने घरची जबाबदारी स्वीकारली होती, त्याच्या कुटुंबाला आधार तो देत होता मग अचानक असं का घडावं? यावेळी असे बरेच विचार मनात येत होते.

प्रशांत आईजवळ तिच्या खांद्यावर मान ठेवून बसला होता तर आकाश आणि सुजित तिथेच बाजूला उभे होते. त्यांचे वडील अतिदक्षता विभागाच्या दाराजवळ खालीच बसून होते, ते दोघेही कुमारच्या वडिलांना धीर देत होते “ठीक

होईल कुमार, तुम्ही काळजी करू नका आणि ऑपरेशनची मुळीच चिंता करू नका आम्ही सोबत आहोत ना" असं बरंच काही दिलासा देत ते एकमेकांशी बोलत होते....

आज त्यांच्यासाठी ती रात्र जणू पुढं सरकत नव्हती पण वेळ आपलं कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडीत होती. सुजीत मात्र कधी एकदाचा यांना डोळा लागतो आणि कधी ती डायरी वाचायला मिळेल, याचीच वाट पाहत होता. पण म्हणतात ना जोवर ठराविक वेळ येत नाही तोवर काहीही घडत नाही....

आता रात्रीचे अकरा वाजत होते बराच वेळ झाल्याने अन मानसिक ताणामुळे त्यांचा डोळा लागला...

## १०. मध्यरात्र

मध्यरात्रीची वेळ। कुमारला ठेवलेल्या अतिदक्षता विभागाच्या दाराजवळच भिंतीला टेकून ते तिन्ही वडील मंडळी डोळे मिटून झोपी गेले होते. तेथून थोड्याच अंतरावर असलेल्या बाकावर प्रशांत आईच्या कुशीत निजला होता तर त्याची आई बाकावर बसून असता तिचाही डोळा लागला होता. सुजित आणि आकाश बाजूलाच असलेल्या जिन्याच्या पायरीला टेकून झोपी गेले होते. त्यामुळे तिथं थोडी शांतता पसरली होती, तर बाहेर गार वारा सुटला होता. ज्याची रुग्णालयातील आतल्या कुणालाही कल्पना नव्हती कारण बाहेरची हवा आत यायला जास्त जागा नव्हती तेव्हा वाऱ्यासोबत काही पान एका बंद खिडकीतून आत येत होते, नर्स किंवा वॉर्डबॉय बहुदा त्या खिडकीला बंद करतेवेळी आतून कडी लावायला विसरले असावेत.... त्यामुळे घामाने चिंब शरीराला गार वारा स्पर्शून गेल्यानं अन वाळलेल्या पानाचा होणारा आवाज ऐकून सुजितला जाग आली. त्याची मुळीच उठायची इच्छा नव्हती पण त्याला तहान सुद्धा लागली असल्याने डोळे चोळत तो उठला आणि पाणी प्यायला गेला, पाणी पिऊन परत येतेवेळी भिंतीला उभी करून ठेवलेली बॅग त्याच्या नजरेस आली आणि तो बॅग जवळ जाऊन हळूच कुणी बघत नाही ना? याची खबरदारी घेत त्याने बॅगमधून डायरी काढली.....

पावलांचा आवाज होणार नाही याची काळजी घेत सुजित डायरी घेऊन एकांतात जाऊन बसला आणि त्याने डायरी वाचायला सुरुवात केली. डोळ्यावर झोप

असल्याने त्याला डुलकी येत होती म्हणून दोन तीन पान वाचुन झाल्यावर झोप दूर व्हावी म्हणून तो येरझरा मारायला लागला तर आजूबाजूला कुणीही नसल्याने आता त्याला हुरहूर लागत होतं, रुग्णालयात रात्री राहण्याची त्याची पहिलीच वेळ होती...... त्यात सगळीकडे इतकं शांत वातावरण होतं की जरासा जरी आवाज झाला तर मन दचकून जात होत...

जास्तच एकाकी वाटत असल्यामुळे तो आकाश जवळ जाऊन पुन्हा त्याच ठिकाणी जाऊन बसला अन डायरी वाचायला लागला. सुरुवातीची पान वाचत असता त्याला कळून चुकलं कि कुमारने इतक्यात कितीतरी गोष्टी त्याच्यापासून अलिप्त ठेवल्या होत्या. अचानक इतकं एकटेपण कुमारच्या वाटेला कस आलं? हाच प्रश्न त्याला पडला होता आणि जिवलग मित्र असून मला कस कळलं नाही? हा एक सवाल त्याच्या मनात होता.....

ती डायरी वाचत असतांना असे बरेच प्रश्न त्याला पडत होते पण त्यावेळी ती डायरी आधी वाचून काढणं महत्वाचं आहे हे जाणून आणि कदाचित त्या डायरीत आणखी काय काय कुमारने लिहून ठेवल, या प्रश्नांची उत्तरं मिळतील म्हणून तो वाचत होता. मग मनात आलेले सर्व विचार बाजूला ठेऊन त्याने पुन्हा डायरी वाचायला सुरुवात केली..... आता सुजित पूर्णपणे ती डायरी वाचण्यात मग्न झाला होता...

कुमारने डायरीमध्ये सुरुवातीलाच लिहिलं होतं..

“जीवनात खूप काही बघायचं बाकी आहे आणि खूप काही मिळवायचं बाकी आहे, शिकून मोठ्ठ व्हायच आहे असं मी ठरवलं होतं, मला जन्म दिला, माझे पालन पोषण केलं, मला शिकता यावं यासाठी कष्ट घेतले……. त्या आई वडिलांना सुखात ठेवायचं असं खुपकाही स्वप्न मी पाहिली होती. बालपणापासून  मीही बरेच चांगले वाईट अनुभव घेतले होते आणि आलेल्या संकटांना तोंड देत समोर जात होतो, आज एका गोष्टीचा आनंद आहे पैसा जरी नसला जवळ तरी दोस्त खूप मिळवले. अगदी जिवलग मित्र मिळाले या नश्वर जीवनात, मला जवळपास सर्वांची गुपितं माहीत होती ते स्वतःहून मला सांगायचे त्याच कारण मला कधीच कळलं नाही….

आज खंत याचीच वाटते आहे कि जेव्हा मला गरज आहे  आधाराची तर मी कुणालाही माझ्या मनातलं सांगू शकत नाही,  इतकं एकटेपण वाटेला येईल आणि स्वतः बद्दल असं काही लिहण्याची वेळ मजवर येईल असं मला वाटलं नव्हतं. आज माझे मन इतके जड झाले आहे की शब्द बनून भावना व्यक्त करणं अशक्य झाले आहे… आणि त्याचसाठी मला पुःन्हा सगळं एकदा सुरुवातीपासून तर आतापर्यंत घडलेलं शब्दांत मांडून जगायचं आहे…. या निमित्तानं सर्वकाही आठवून का हि वेळ यावी? या प्रश्नाच उत्तरं मिळवायचं आहे… जीवनातील साऱ्या आठवणी मोत्यासारख्या या पेन आणि कागदाच्या मिलनातून एका दोरात ओवायच्या आहेत….

परिस्थिती काहीही असो, समस्या कोणतीही असो, मी सर्वांना धीर देत होतो. संयमाने त्या वेळेचा सामना करायला सांगत होतो आणि माझ्या मित्रांना

सावरत होतो पण आज माझी अवस्था अशी आहे की दुःख सांगून मन मोकळं न झाल्याने अश्रू पापण्यांवर रोखून ठेवले आहेत...... कधी हक्काचा खांदा आधार म्हणून मिळेल आणि मनसोक्त रडता येईल असं होऊन गेलं पण आता सगळं असह्य झालं तेव्हा कोणी महान शायरीकारचं लिखाण आठवलं ते म्हणतात की....

"मनातील जसं शिल्पात साकारता येते तसंच कधी कधी शब्दात साकारता येते आणि मनं हलकं व्हायला मदत होते."

म्हणून मला जे काय घडलं ते लिहावं लागत आहे.... आपण म्हणत असतो की जे काही आपण आज करतो त्याची छाया किंवा परिणाम आपल्या भविष्यावर होत असतो....

तेव्हा मी नेमका कुठं चुकलो याची मला कल्पना आहे पण ती गोष्ट चुकीची आहे की नाही हेच मला अजून कळलं नाही. ती गोष्ट आहे 'प्रेम'. पण ते तर नैसर्गिक आहे मग मी चुक केली की नाही, ती माझ्या आयुष्यात येण्यापूर्वी मलाही प्रेम नावच फक्त माहित होतं पण जेव्हा तिला मी पहिल्याच वेळी पाहिलं तेव्हा मला प्रेमाची प्रचिती आली ती जीवनात आली आणि जीवन जगतांना एक वेगळाच आनंद मी अनुभवत होतो...

जवळपास चार वर्षे झाली मी तिला शेवटचं पाहिलं. पण आजही ती माझ्या मनात घर करून आहे. अगदी पहिल्या वेळेस तिला पाहिलं तशीच। पहिल्या भेटीनंतर कधी मैत्री होऊन तिच्या सहवासाची मला सवय झाली कळलंच नाही. असंच होतं ना प्रेमात, कधी आपण स्वतःला विसरून समोरच्या व्यक्तीला मन समर्पण करून त्या व्यक्तीचं होऊन बसतो, तिची काळजी घ्यायला लागतो, त्याच व्यक्तीचा विचार करत राहतो, वास्तवाचे भान हरपून  एका वेगळयाच भावविश्वात आपण जगत असतो आणि त्यावेळी जे काय आपण अनुभवत असतो त्याचा आनंद शब्दात व्यक्त करणं जमणार नाही कारण स्वप्नात जे घडतं तसंच वास्तवात घडू शकत नाही... ती समोर असतांना वेळ तिथंच थांबून रहावी असं वाटायचं आणि तिने असच माझ्याशी बोलत रहावं सतत असं वाटायचं.... असेच दिवस जात होते अन प्रत्येक दिवशी तिच्या भेटीची मला ओढ लागली होती, तिचा चेहरा बघितला नाही तर वाटायचं जणू आज दिवस उजाळलाच नाही...”

कुमारने असं लिहिलेलं वाचत असताना मध्यरात्र उलटून गेल्याचं सुजितला कळलं नाही तो वास्तव विसरून कुमारच्या भावविश्वात जगत होता. समोर वाचत असता त्याला कधी हसू येत होत तर कधी तो खूप भावूक होत होता. सुजितने पहाटेच्या 5 वाजेपर्यंत संपूर्ण डायरी वाचून काढली...

आता मनात असंख्य विचार आणि प्रश्न यायला लागले होते... कुमारने कधीच तिच्याबददल मला सांगितलं नाही... का सांगितलं नाही? इतकं सगळं घडलं पण त्यानं कधी कधी म्हणून मला सांगणं गरजेचं नाही समजलं... मी मात्र त्याला

पर्टीकं बारीकसारीक गोष्ट सांगत राहिलो... माझ्याबद्दल सर्वकाही फक्त आणि फक्त कुमारलाच माहित आहे.... मग का त्यानं असं वागावं? एक अनोळखी व्यक्तिसारखं जणू मला तो त्याचं दुःख समजून घेण्याबद्दल साशंक असावा....

कुमार ला तो जवळजवळ 8 ते 10 वर्षांपासून ओळखत होता.... त्याची पहिली भेट कुमारसोबत झाली ती 8 वीच्या वर्गात... पण आज डायरी वाचून झाल्यावर त्याला त्या पहिल्या भेटीपासून कुमार आणि त्याची मैत्री घट्ट होत गेली... ते आठवत असता तो कुमारच्या आठवणी जपत पुन्हा एकदा कुमार ने का सर्व सहन करत मला न सांगता गुपित ठेवलं हाच एक प्रश्न त्याला सतावत होता...

डायरी वाचून झाल्याचा आनंद त्याच्या मनात होता तर एकीकडे या सर्व गोष्टी पासून तो अलिप्त असल्याने आज कुमार्रसही हि अवस्था झाल्याचं त्याला वाटत होत..... असे बरेच विचार त्याला

त्रास देत होते तर सोबत असतांना जे काय क्षण त्यांनी एकत्र घालवले त्यानां आठवत तो डोळे मिटून कुमारने वेळोवेळी केलेली मदत, जीवनात संकटांना सामना करतेवेळी त्याचा सल्ला घेऊन तो सावरला ते प्रसंग त्याच्या मनात घोळत होते...... आणि आज कुमारवर काय हि वेळ आली याच दुःख त्यालाही असह्य वेदना देत होती... कुमार ने कित्येकांना सावरलं होतं.... 2 ते 3 जणांना आत्महत्या करत असल्याचं माहित होताच त्यांना जगण्याची नवीन वाट, दिशा अन जीवनात जगायला अजून काही तरी बाकी असल्याचं पटवून दिलं होतं...

## ११. एक नवीन पहाट

डायरी वाचत असता पहाटेचे 5 केव्हा वाजले सुजितला कळले नाही. डायरीचे शेवटचे पान वाचून झाल्यावर त्याने डायरी बंद करत पापण्यांवर थांबलेले आसवं पुसले. डायरी मांडीवर ठेवून तो तसाच बसला होता, आता त्याच्या मनात विचारांचे वादळ उठले होते, रात्री 12 वाजल्यापासून तो जागी होता पण त्याला झोप येत नव्हती कदाचित डायरीत कुमारने जे काय लिहिलं होतं यामुळे; अनेक प्रश्न त्याला पडले होते मग विचार करत असता कुमारच्या आठवणी मनात गर्दी करायला लागल्या अन विचार करत असताच त्याचा डोळा लागला अन त्याला झोप लागली पण एक दीड तास झाला न झालाच वाहनांचा आवाज आल्याने त्याला जाग आली, शहर जाग झालं होतं, गावाकडे चिमण्या पाखरांचा किलबिलाट सुरु झाला की पहाट होते तर इकडे शहरात पहाटेच वाहनाची वर्दळ सुरु होते अन त्याचबरोबर वाहनांचा कर्कश आवाज।

जिल्हा रुग्णालय शहराच्या मुख्य रस्ताला लागूनच असल्याने तिथे वाहनांची जरा जास्तच ये जा होत असे. सुजित जागा होऊन आजूबाजूला पाहत होता तर सर्व वडीलमंडळी उठून कुमारला दाराच्या काचेतून पाहत होते, प्रशांत आणि आकाश झोपूनच होते तर कुमारची आई समोरून येत असल्याचे त्याला दिसले मग तो लगेच उठून उभा राहिला..

कुमारची आई ओला चेहरा साडीच्या पदराला पुसत होती, समोर चालत येत होती. सुजित चेहरावरून हात फिरवत जागीच उभा होता मग आळस काढत तो तिच्या पुढे चालत जाऊन बॅगजवळ पोहोचला आणि त्याने डायरी परत बॅगमध्ये ठेवली. मग बॅग बाजूला सारून तो, जिथे सर्व गोळा झाले होते म्हणजेच ICU च्या दाराजवळ गेला आणि कुमारला पाहू लागला जसे बाकीचे पाहत होते. इतक्यात सुजितचे वडील म्हणाले चला, हात पाय धुवून घेऊया आणि ते जायला लागले, सुजित आकाश आणि प्रशांतला उठवणार इतक्यात त्या दोघांनाही जाग आली मग ते तिघेही हात पाय धुवून आले......

चहा सोबत घेत ते सर्व डॉक्टर येण्याची वाट पाहत होते. आता जवळ जवळ सकाळचे 8 वाजले होते......

नर्स चेकअप करण्यासाठी वॉर्डमध्ये फेऱ्या मारीत होत्या, तेव्हा दोन नर्स कुमारला चेक करायला आल्या आणि आत गेल्या. जे काय पाहायचं ते पाहून कुमारला तपासून त्या बाहेर आल्या. मग सर्वजण त्यांना कुमार कसा आहे विचारत होते त्यावर अजून कुमारच्या तब्येतीत काही सुधार नसल्याचे नर्सनी सांगितले आणि या निघून गेल्या. कुमारची आई डोळ्यातील आसवं पदराने टिपत खाली बसली. काल कुमारला पाहायला आल्यापासून ते आतापर्यंत ती माउली मनात एकच आस लावून होती...

आता पुन्हा तिला शोक आवरत नव्हता, ती रडत होती. प्रशांत तिला समजावीत होता...

“आई, ठीक होईल दादा तू रडू नको”

असाच काही वेळ निघून गेला. रात्री उशिरा आणि एकदम थोडंच जेवण केल्याने आकाश आणि कुमारचे वडिलांनी नास्ता आणला आणि त्या वेळी कुणालाही काही खायची इच्छा नव्हती पण त्यांनी सर्वांना समजावत जरा जरा नाश्ता खायला लावला... सर्वांनी थोडा थोडा नास्ता घेतला आणि काही वेळाने जवळ जवळ सकाळी 10:30 वाजता डॉक्टर आले. केबिनमध्ये जाऊन लगेच दुसरीकडे कुठे न जाता कुमारला पहायला आले....

डॉक्टर कुमारला चेक करून बाहेर आले, कुमारच्या आई वडिलांजवळ येऊन म्हणाले.....

“कुमार होता तसाच आहे अजूनही, मी सिटी स्कॅनचा रिपोर्ट पुन्हा एकदा पाहतो पण ऑपरेशन शिवाय काहीही उपाय नाही. तेव्हा तुम्ही तयारीत रहा बहुदा आजच ऑपरेशन करावं लागणार. येतो मी” असं म्हणत डॉक्टर जायला लागले तेव्हा आकाश आणि सुजित चे वडील डॉक्टरांना थांबवून विचारायला लागले “सर, दोन मिनिटं थांबा, कुमारच्या ऑपरेशनला किती खर्च येईल आणि दरम्यान त्याला काही होणार नाही ना? कारण सध्या त्याच्या घरचा कर्ता तोच आहे आणि त्याच्या घरची परिस्थिती मध्यम आहे..”

त्यावर डॉक्टर म्हणाले “किमान तीस  हजार रुपये खर्च येईल आणि आम्ही आमचे 100 टक्के प्रयत्न करणार आहोत तुंम्ही काळजी करु नका बाकी त्यांच्या कुटुंबियांना आधार देत रहा... ओके आय शुड गो नाऊ.....”

डॉक्टर निघून गेल्यावर ते दोघे कुमारच्या आई वडिलांजवळ येऊन त्यांना धीर देत म्हणत होते "काळजी करू नका सगळं ठीक होईल, आम्ही बोललो डॉक्टरांशी. ऑपरेशन झालं की बरा होईल म्हणाले कुमार, तर आपण घरी जायला हवं म्हणजे आपणाला ऑपरेशन करिता आवश्यक तयारी करता येईल...."

आकाश, कुमारचे आई वडील आणि सुजितचे वडील असे चार जण, दोन दुचाकी सोबत घेऊन गावी जाण्यास निघाले, ऑपरेशनसाठी जे काय आवश्यक पैशाची व्यवस्था करण्यासाठी; तर प्रशांत, आकाशचे वडील आणि सुजित तिथेच कुमारजवळ थांबले होते. रुग्णालयात आत रुग्णांना पाहण्यास नातेवाईकांची ये जा सुरु झाली होती... पण तरी शांतता कायम होती... तर बाहेर लोक रस्ताने रोजच्या कामावर जात होते रस्तावर बरीच वाहन जात होती काही हळू तर काही वेगात जात होती.... त्या सर्वांसाठी तो दिवस रोजच्यासारखाच होता तर कालचा दिवस कुमार आणि त्याच्या कुटुंबासाठी.... , एक नवीन पहाट घेऊन आला होता ज्याची त्यांना काहीएक कल्पना नव्हती सुजित बाहेर येऊन पायरीवर बसला होता आता एकटा असल्याने डायरीत वाचलेलं त्याच्या मनात उमटत होतं विचार करतच त्याने मोबाईल बाहेर काढून त्यामध्ये कुमारचं सिमकार्ड टाकलं आणि कुमारच्या सिमकार्ड मधला नंबर काढून फोन लावला.

सुजितने फोन लावला आणि दुसऱ्या बाजूने फोन घेण्याची वाट पाहत होता पण बऱ्याचवेळा फोन लावून कुणीही फोन घेत नसल्याने तो हताश झाला आणि

मनात येणारे अनेक प्रश्न अन विचारांची कालवाकालव यामुळे त्याच डोकं ठणकत होत... तेव्हा पायरीवरून उठुन तो आत प्रशांतजवळ गेला. त्याला डायरीबद्दल सांगावं असा विचार सुजितच्या मनात येऊन गेला पण त्याने स्वतःला सावरलं....

प्रशांत ICU जवळच्या त्याच बाकावर बसून होता. सुजित याच्या बाजूला बसला तरी याची त्याला किंचितही जाणीव झाली नाही... सुजित त्याच्या खिन्न झालेल्या चेहऱ्याकडे बाराकाईने पाहत त्याच्या मनात काय चाललं असणार याचा विचार करत....

“प्रशांत... प्रशांत...” अस त्याचा खांदा हळूच हलवून त्याला आवाज दिला...

भानावर येवून प्रशांत “हं... काय.. काय झालं.? ”

“अरे असं काय करतोस? सांभाळ जरा स्वतःला.”

“कस सावरू? कसा सांभाळू स्वतःला...? ... तूच सांग ना सुजित दादा..”

“अरे ठीक होईल कुमार... आणि तू काय लहान आहेस का आता..? तू तर आई बाबांना धीर द्यायला हवा... आता.”

“दादा म्हणायचा नेहमी... अजून तू लहान आहे... दादाने असं म्हटलं की वाटायचं मी बाळंच आहे जणू... नेहमी मला तो सांभाळून घेतो...”

“अरे ते सगळं ठीक आहे पण आता जी वेळ आली आहे.... तुही स्वतः सावर आणि आई बाबा ना सुद्धा... प्रत्येकाला जीवनात अश्या वेळी मोठ्ठ व्हायची संधी

मिळते... आणि एकदा सर्वांना मोठं व्हावच लागतं... आपली जबाबदारी घ्यावीच लागते.... कुमारने नाही का घेतली....? ”

सुजित त्याला त्या धक्क्यातून सावरून त्याच मन जे दडपण असह्य झाल्याने जड झालं होतं त्यातून त्याला मोकळं करायचा प्रयत्न करीत होता..... यांत त्याला यश मिळाल्याचं जाणवत होतं....

हे असं रुग्णालयात सर्व जागीच थांबलं होतं तर तेथून खूप दूर एका शहरात जिथं याच शहरासारखं  लोकवस्ती, मोठमोठया इमारती, वाहनांची वर्दळ आणि त्यांचा आवाज, आकाशाला भिडणारे धुराचे लोट अगदी जसेच्या तसे होते.... रस्त्यावर वाहनांची आणि माणसांची ये जा सुरु होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला काही दुकान उघडलेली, थोडं पुढं जाता भाजीबाजार, फळांच्या गाड्या, काही शॉप होती. तेव्हा गर्दीतून एक व्यक्ती भाजीची पिशवी हाती घेऊन पाठमोरी जातांना..... तिने आकाशी रंगाची साडी नेसलेली, लांब केसाची वेणी घातलेली, उंचीला शोभेल अशी डौलदार शरीरयष्टी आणि मोहून टाकणारी देहबोली असलेली, भर उन्हात पायी चालत असल्याने घामाचे थेंब तिच्या मस्तकावरून खाली येत होते म्हणून जरा घाईतच ती बहुदा घरी जात होती....

## १२. शेवट कि सुरुवात?

ती घराच्या आवाराचे गेट उघडून आत शिरली. आवाराचे गेट लोटून आत जाताच कुणाचीही नजर पडेल अशी अतिमोहक गुलाबाची फुलं हवेत डोलत होती.... आवाराच्या भिंतींना लागूनच लहान लहान पान असणाऱ्या कलमांची मोठ्या मेहनतीने लागवड केलेली.... अंगणाच्या मध्यात सम्पूर्ण अंगण झाकनर इतकं विशाल बदामाचे झाडं... जवळच थोडं दूर एका कोपऱ्यात असणारा मोगरा हि त्याचा सुगंध उधळत त्याच् अस्तित्व जणू  लक्ष हेरून घेत होता.... अशीच आणखी बरीच झाडे तिथलं वातावरण प्रसन्न ठेवण्याची जबाबदारी अगदी प्रामाणिक पणे बजावत होते.....

आवाराच्या गेट जवळून अगदी चार पाच पावलं चालत जाताच दारासमोर तुळशी वृन्दावन... या सर्व देखाव्यावरून शहरात कमी जागा असल्याची आणि त्यातही कमी जागा असूनदेखील निसर्गाच्या सानिध्यात कसे राहता येते याची ओळख निर्माण केलेली दिसत होती...

तिने दाराजवळ पिशवी ठेवून कुलूप उघडले.. ती घरात गेली... पिशवी टेबलावर ठेवून घामाने चिंब झाल्याने हात पाय धुवून चेहऱ्यावरचे पाणी टॉवेलने टिपत खुर्चीवर बसली...

'बाप रे बाप काय उन्ह तापत आहे? ' स्वतःशीच बोलत होती. मग पंखा सुरु करुन ती खुर्चीत जरा मागे सरकून डोळे बंद करून घामाने चिंब झालेल्या शरीराने थंड वारा घेत सुखावली.... दोन्ही पाय एकावर एक ठेवून पाठ खुर्चीला टेकवून केसाची वेणी समोर घेऊन शांतपणे बसली.... तेव्हा नुकतेच गुलाबाचे फूल उमलावे इतका सुंदर निरागस तिचा चेहरा दिसत होता. 5 -10 मिनिट नंतर बरं वाटल्याने तिने उठून भाजीची पिशवी किचनमध्ये नेऊन ठेवली आणि टीव्ही सुरु करुन तिने किती वाजले बरं? असं स्वतःला विचारत मोबाईल हाती घेतला तर तिला 10 वेळा आलेले फोन त्यामध्ये दिसले. कुणाचे फोन बघण्या म्हणून तिने मोबाईल वर पाहिले तर एकाच नंबर वरून फोन आल्याचे तिला समजले तेव्हा तिने त्या नंबरवर फोन केला आणि दुसऱ्या बाजूने 'हॅलो' असा आवाज ऐकू येताच...

तिने विचारले “हॅलो, आपण कोण? काही वेळापूर्वी या नंबरवरून फोन आला होता”

त्यावर दुसरीकडून... “हॅलो मी सुजित बोलतो आहे” तिला असं उत्तर मिळालं.

जरा विचार करून ती फोनवर बोलू लागली माफ करा मी आपणास ओळखलं नाही”

त्यावर “ मी कुमारचा मित्र सुजित बोलत आहे” असं म्हटल्यावर

तिने आश्चर्याने “हॅलो ! सुजित.. सॉरी सॉरी अरे बऱ्याच दिवसांनी तुझा आवाज ऐकला ना... म्हणून ओळख नाही पटली बोल ना कसा आहेस तू आणि अचानक मला कसा काय फोन केला..? ”

आता सुजित थोडा अडखळत बोलत होता...

“काम होतं एक” अन तो गप्प झाला..

मग दुसऱ्या बाजूने “ हॅलो सुजित बोल ना गप्प का झाला? काय काम आहे?”

सुजित बोलू लागला “ तू कुठे आहे सध्या ? काल... काल... कुमारचा अपघात झाला....”

त्यावर ती एकदम दचकून

“काय? कुमारचा अपघात झाला... ! कधी? केव्हा? अन कसा झाला? तो ठीक तर आहे ना..”

त्यावर सुजित म्हणाला..

“काल झाला अपघात जवळपास 6 वाजता...”

ती म्हणाली “ अरे पण कालच तर तो माझ्याशी बोलला... मला बर्थ डे विश केलं त्यानं... कुठे आहे तो आता? ”

“आपल्या गावाजवळच्या जिल्हा रुग्णालयात त्याला दाखल केले आहे...” सुजित म्हणाला

त्यावर “ मी येत आहे त्याला भेटायला । तू आहेस ना त्याच्यासोबत..? ” तिने विचारले...

त्यावर सुजितने होकार दिला....

“तो ठीक तर आहे ना? ती पुन्हा पुन्हा विचारत होती...

तेव्हा सुजितने तिला कुमारची अवस्था सांगितली..

“ जमलं तितक्या लवकर तू ये... तुला मला काही सांगायचं आहे....” तो असं म्हणाला आणि त्याने फोन ठेवला.

तिला हे ऐकून एकदम धक्का बसला आणि ती खाली बसली... काही वेळ तिला सर्व जणू जागीच थांबलं असं वाटत होतं.... प्रत्येक दिशा सारखीच जाणवत होती... नजरेसमोर अंधार पडायला सुरुवात झाली होती... तीच मन मानायला तयार नव्हती की कुमार ला अपघात झाला.. तिला राहून राहून त्याची आठवण येत होती सारखे वाटत होते.... मी तर जबाबदार नाही ना कुमारच्या अपघाताला..?

कालच तर तो बोलला माझ्या सोबत, तेही अचानक चार वर्षांनंतर..... का त्याने इतक्या दिवसांनी मला फोन केला फक्त बर्थ डे विश करायला कि अजून काही...? काल अचानक मध्येच बोलता बोलता त्याचा फोन बंद झाला होता... माझ्याशी बोलत असतांना तर त्याचा अपघात झाला नसेल ना.... मीच कारणीभूत आहे त्याच्या या अवस्थेला... ती मनातच असे विचार करत स्वतःला दोष देत असता तिला कुमार आणि त्याच्या पुसट आठवणी, ज्या चार वर्ष लोटून गेल्यानं नीट आठवतं नव्हतं... तर काही आठवत होतं....

शेवटी मानवाचा स्वभावविशेष आहे की जे काय जीवनात घडतं ते आपण कालांतराने विसरून जातो.... ठराविक काही क्षण सोडून.... अति आनंदाचे किंवा दुःखाचे क्षण वगळता......

ती आठवत होती ते सारे... जे तिच्या मनात आजही कुठेतरी घर करून होते.....

कुमार सोबत ओळख झाली तो दिवस.... मैत्री झाली तो क्षण... एक मित्र म्हणून त्याने निभावलेलं त्याच प्रामाणिक नातं आणि बरेच काही... ती आज आठवत होती..... कुमार ने कसं तीच आयुष्य अगदी व्यापून टाकलं होतं.... एक वेळ होती की कुमार आणि ती म्हणजे जणू काही कोण्या दुसऱ्या दुनियेत सफर करत असल्याच त्यांनाही जाणवत होतं... मग अचानक तिला शेवटी ज्यादिवशी कुमार तिला भेटला

तो दिवस आठवला... आणि वेळ पुन्हा एकदा तिथंच थांबून आहे असं तिला वाटून गेलं... नकळत तिच्या डोळयात आसवं चमकली... पापण्या ओल्या झाल्या...... ते क्षण आठवल्यानं कि काल कुमार चा अपघात झाला यामुळे ती वास्तवाचं भान विसरून खाली ओघळणारे आसवं तसेच गालावरून फरशीवर ढाळत बसली होती...

बराच वेळ असाच निघून गेला.... पण ती कुमारचा अपघात झाला असे कळल्यावर त्या आकस्मिक धक्क्याने जशी खाली बसली तशीच होती.... फोन लावला तेव्हा टीव्ही चा आवाज बंद करून ठेला असल्याने त्यावर येणारे मूक चित्र तसेच बदलत होते... त्यावर ठेवलेली शोभेची फुलं आधीच निर्जीव होती... भिंतीवर लावलेली छायाचित्र बोलकी वाटत होती पण तो केवळ भास होता... जवळच टिक टिक करणार घड्याळं तेवढं शांत नव्हतं... तर ती फोन लावण्याआधी ज्या खुर्चीवर बसून होती आता त्याच खुर्चीवर एक हात ठेवून.... दोन्ही पाय मागे करून.... झटक्याने अचानक खाली बसल्याने तिची लांबलचक वेणी मागे जाऊन फरशीला स्पर्श करीत... भान हरपून बसलेली... बाजूला असलेल्या सोफ्यावर टीव्ही रिमोट तसंच पडलेलं...

सगळीकडे शांतता पसरली होती.... फोनवर मेसेज आल्याने ती भानावर आली... आजूबाजूला नजर फिरवत तिने गालावरची आसवं पुसली..... स्वतःला सावरत ती खुर्चीचा आधार घेत उभी झाली... खुर्चीवर बसून जरा वेळ मन शांत करत तिने रिमोटने टीव्ही बंद केला.... मग मोबाईल हाती खेळून मेसेज पहिला तर तो

कस्टमर केयर कडून आल्याचं तिला कळलं.... जरा वेळ निघून गेला मग तिने टीव्ही चं बटन बंद केले... किचनमध्ये जाऊन थंड पाणी पित बॉटल तशीच हाती घेऊन सोफ्यावर येऊन बसली...

आता ती सावरून विचार करत होती... काय चाललंय हे चार वर्षानंतर...? कशाचा शेवट आहे ना..? जे नव्हतंच कधी जीवनात त्याचा शेवट.... कि जे काय बाकी आहे त्याची नवीन सुरुवात....? काही कळत नाही... !

असे विचार तिला सारखे सतावत होते... मग मन आवरून ती उठून उभी झाली आणि स्वतःशीच पुटपुटली...

“ मला भूतकाळात काय झालं हे विसरून मैत्रीच्या नात्याने कुमारला एकदा भेटायला जायला हवं... ! जर माझ्यावर अशी वेळ आली असती तर तर.... तर... कुमार नसता का आला.... नक्कीच आला असता.. !”

स्वतःशीच सुरु असलेला संवाद पूर्णविराम देत तिने संपवला... आणि ती त्याला भेटायला जायचं म्हणून घाईतच तयारी करू लागली.... जास्त वेळ वाया न घालता तिने सर्व पटापट आवरून अंगावर होती त्याच कपड्याने सोबत एक हॅन्ड बॅग घेऊन दार बंद केलं... दाराला कुलूप लावलं आणि बस स्थानक जवळच असल्याने ती पायीच बस स्थानकाकडे जायला लागली....

वाचक मित्र हो

नमस्कार

“मला काही सांगायचंय” या कादंबरीचा हा पुर्वार्ध आपल्याला कसा वाटला? कृपया मला खालील फ़ोन क्रमांकावर किंवा मेलवर कळवा. त्यानंतर आपल्याला त्याचा उत्तरार्ध पाठवला जाईल.

आपला मेल पत्ता sms केल्यावर आपल्याला मेलने पुढील भाग मिळेल.

धन्यवाद

प्रफ़ुल शेजव

ई मेल : praful101shejao@gmail. com

मोबाईल नंबर : 8805967973

पत्ता : मु. पाळा ता. नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती

**ई साहित्य प्रतिष्ठान** दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर "मराठी पुस्तक" किंवा "Marathi ebook" टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके "विनामूल्य" देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत "साहित्यरत्नांच्या खाणी" निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव केला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची बारा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे लेखक आता येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद. आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

आमेन

सुनील सामंत
अध्यक्ष
ई साहित्य प्रतिष्ठान